


दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४६२ शुक्रवार दि ११ सप्टेंबर २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मनोज जरांगेंच्या उपोषणावर सरकारचं लक्ष, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याशी चर्चा करताना काय घडलं?




**वृत्तसंस्था/मुंबई**

मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसीतून मराठा-कुणबी आरक्षणासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. गेल्या १४ दिवसांपासून जरांगे उपोषणावर बसले आहेत. जरांगे उद्या मुंबईला उपोषण करणार असल्याची घोषणा करण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या भूमिकेकडे साऱ्यांचं लक्ष लागलं आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणावर सरकारचं लक्ष आहे. याच मनोज जरांगे पाटील यांनी घाणेरड्या भाषेत जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केल्याचं मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं. ते नाशिकमध्ये बोलत होते. मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकमध्ये माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावर मंत्री भुजबळ म्हणाले, सरकार त्यांच्याकडे पाहत आहे. व्यवस्थेचे काम आहे. यंत्रणा लक्ष देतील योग्य अयोग्य काय आहे. लोकशाहीत अधिकार आहे. त्यांनी घोषणा केली, प्रत्यक्ष काय होतं, पाहावं लागेल. सोयी-गैरसोयी पाहाव्या लागतात. सर्व जण सांगून सांगून दमले आहेत. आता मी काय सांगणार. एक शिष्टमंडळ भेटायला जाणार होतं. त्यांनी नकार दिला. ते गेले नाहीत. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सरकारच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी घाणेरड्या भाषेतून जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली. ती महिला नरवस झाली होती. मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावणकुळे, संजय शिरसाट यांना कोणत्या भाषेत बोलतातफ नाशिक-पुणे रेल्वे मार्गाबाबत भुजबळ म्हणाले, ङ्गसरळ मार्ग केला तर १०० किलोमीटर कमी लागेल. ट्राफिक वेगाने होणार आहे. सेमी हायस्पीड नाशिक पुरता नाही. उत्तर महाराष्ट्रात फायदा होईल. खुडदला अडचण होईल म्हणे. वेगवेगळे देशात मार्ग काढतोच आहे. काकोडकर विद्वान आहे. मोठे टनेल काढतो आहेच ना? भारत सरकारच्या प्रकल्पवार परिणाम होणार नाही. ला रेल्वेने सहभागी करून घ्यावे. हे जर झालं तरच फायद्याचे आहे. १०० किलोमीटर वाढलं तर फायदा होणार आहे. मूळ कल्पना अमलात आणा. एका वर्षापूर्वी नकाशा दिला होता. मुख्यमंत्री यांनाही नकाशा दिला आहे. त्यात आम्ही यशस्वी ठरूफ एकनाथ शिंदे यांच्या इंग्रजीतील भाषणावरही भुजबळांनी भाष्य केलं. ङ्गहेतू आरोप करण्यात अर्थ नाही. स्वागत झालं आणि भाषण उत्तम झालं. वेगवेगळे लोक जात असतात. मी सुद्धा परदेशात गेलो आहे. आपण काय चांगलं केलं हे सांगतो. एकनाथ शिंदे यांनी जे यश संपादन केलं, त्याबद्दल आनंद आहेफ एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर भुजबळ म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सगळ्या मागण्या मान्य केल्या आहेत. अराजकीय संस्था आणि राजकारण भेसळ होता कामा नये. राजकीय पक्षाला मोर्चा काढायचा अधिकार आहे. पण अराजकीय संस्था असल्यावर त्यात राजकारण आणू नयेफ

# शाळेत कांदा-लसूण खाण्यावर बंदी, आदित्य ठाकरे भडकले सत्ताधाऱ्यांना कडक शब्दात सुनावले...




**वृत्तसंस्था/मुंबई**

मिरा-भाईंदरमध्ये भाजप आमदार नरेंद्र मेहता यांच्या शाळेतील एका निर्णयाने नव्या वादाला तोंड फुटलं आहे. मिरा-भाईंदरमध्ये विद्यार्थ्यांना डब्यात कांदा-लसूण, बटाटा, बीट, कंदमुळांच्या भाज्या आणण्यास मनाई केली आहे. या निर्णयाचे राजकीय वर्तुळात पडसाद उमटण्यास सुरुवात झाली आहे. संजय राऊत यांनी हा लव्ह जिहादवरून भयंकर प्रकार असल्याची टीका केली. संजय राऊत यांच्यानंतर आता आदित्य ठाकरे यांनीही कडक शब्दात सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, ङ्गमराठवाडा असेल किंवा कोल्हापूर असेल. या भागात जैन धर्मीय लोक मिसळून राहतात. तरीही कुठे वाद झालेले नाहीत. एमएमआरमध्ये ठरविक लोक आहेत, ते कांदा-लसूण खाऊ नका, असे सांगत आहेत. जैन धर्म शांततेवर आधारित धर्म आहे. तसे सर्व धर्म असतात. पण कुठल्याही धर्मावर स्वत:च्या धर्माची बंधने लादणे ही हिंसाच आहे. जैन धर्मात अपरिहार्य असतं. परंतु आज मी बघतो की, शाळेचं पाहत आहे की, तुम्ही दुसऱ्यांवर हिंसा करत आहात. ङ्गश्रावण संपत आला आहे. आपले आगरी-कोळी बांधव असतात, त्यांनी सांगितलं की, त्यांचं नैवेद्य खायला सांगितल्यास तुम्ही काय कराल. पश्चिम बंगालमध्ये बाहेरून येऊन मासे खाऊ नका, असे सांगितले जात होते. त्यांना कसं पळवलं, हे बघितलं. सगळ्यांनी सगळ्यांचा धर्म घरात पाळावा. दुसऱ्यावर लाद नये. आज त्या शाळेत काही हिंदू असतील. मराठी हिंदू सगळं काही खातोच की. त्यांचा धर्म लादत आहेत. हिंदुत्वावादी सरकार आहे, हिंदुत्वावर आक्रमण होत आहे, त्यांच्यावर काय बोलणार,असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला. आदित्य ठाकरेंनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर भाजप नेते काय बोलतात, याकडे साऱ्यांचे लक्ष लागलं आहे. दरम्यान, महापालिकेतील सत्तेतून बाहेर पडू , असा इशारा शिंदे गटाचे अमेय घोले यांनी भाजपला दिला. त्यावर आदित्य ठाकरे म्हणाले, ते काही महत्वाचे नाहीत. त्यांचं वक्तव्य आम्ही गांभीर्याने का घ्यावे? शिंदे गट त्यांचे गुलाम आहेत. त्यांनी मोठी विधाने करू नयेत.

# मूल माणसाचे वडील असते!



मूल हे माणसाचे वडील असतेफ ही कवी विल्यम वर्डस्वर्थ यांची गाजलेली काव्यपंक्ती केवळ साहित्यिक कल्पना नसून, त्याला आता भक्कम वैज्ञानिक आधार मिळाल्याचे सिद्ध झाले आहे. सामान्यतः नऊ महिने बाळ गर्भाशयात वाढवल्यानंतर आई त्याला जन्म देते आणि या काळात तिच्या मेंदूत तसेच शरीरात जैविक बदल होतात, हे सर्वश्रुत आहे. परंतु, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, पालकत्वाची जबाबदारी पेलत असताना आईप्रमाणेच वडिलांच्या मेंदूत आणि शरीरातही अनेक अनुकूलनीय बदल ( ) घडून येतात. पालकत्व म्हणजे केवळ मूलाचे संगोपन करणे नव्हे. त्याचा प्रभाव तळ्यात टाकलेल्या खड्याप्रमाणे कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर सतत रुंदावत जातो. पालकत्वामुळे सुरुवातीला रात्रीची जागरणे, बाळाचे रडणे, आजारपण यांमुळे शारीरिक आणि मानसिक ताण-तणाव वाढतात. माता-पित्याच्या जीवनशैलीवर याचा थेट परिणाम होतो. तरीही मेंदूतील हे बदल अखेर त्यांच्या फायद्याचे आणि ङ्कन्युरोप्रोटेक्टिव्हफ (मेंदूचे संरक्षण करणारे) ठरतात. मेंदूच्या या घडामोडींमध्ये ङ्कन्युरोप्लास्टीसिटीफ म्हणजेच चेतापेशींच्या जाळ्याची लवचीकता महत्त्वाची भूमिका बजावते. युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाच्या प्राध्यापिका डार्बी सॅक्सबी ( ) आणि त्यांच्या चमूने पहिल्यांदाच वडील होणाऱ्या ४० पुरुषांच्या मेंदूचे स्कॅनिंग बाळाच्या जन्माआधी आणि जन्मानंतर केले. या संशोधनात एक ठळक फरक समोर आला. बाळाच्या जन्मानंतर पित्याच्या मेंदूतील ङ्ककॉर्टेक्सफ भागातील विशिष्ट चेतापेशींच्या () जाळ्याचे आकारमान कमी झाले होते. हा भाग इतरांचे विचार, हेतू आणि भावना ओळखण्याचे काम करतो. हे आकारमान कमी झाल्यामुळे पुरुषांचे स्वतःवरील आणि बाहेरील जगावरील लक्ष थोडे कमी होऊन ते बाळावर केंद्रित होते. यामुळे मुलामध्ये भावनिक गुंतवणूक वाढते, वडील बाळासाठी जास्त वेळ देतात, आपुलकीचा बंध घट्ट होतो आणि पालकत्वाचा आनंद वाढतो. या सकारात्मक बदलांनाच ङ्कअनुकूलनीय बदलफ ( ) म्हटले जाते. तसेच २०२३ च्या एका संशोधनानुसार, काही पुरुषांमध्ये ङ्कहिपोकँपसफ या स्मृती केंद्राचे आकारमान वाढलेले आढळले. ज्या वडिलांच्या मेंदूत असा बदल झाला, त्यांचे मूलाशी असलेले नाते अधिक दृढ होते. ते मूलाशी अतिशय मायाळू वर्तणूक ठेवतात आणि त्यांना पालकत्वाचा ताण जाणवत नाही. बाळाच्या जन्मानंतर पाचपैकी एका आईला आणि १० पैकी एका पित्याला ङ्कपोस्ट पार्टम डिप्रेशनफ (प्रसूतीनंतरचे नैराश्य) या समस्येला सामोरे जावे लागते. पालकत्व जितके अर्थपूर्ण आणि आनंददायी असते, तितकेच ते कधीकधी थकवणारे आणि ताण देणारे ठरू शकते. मात्र, दीर्घकाळात हेच पालकत्व मेंदूसाठी वरदान ठरते. ब्रिटनमधील ङ्कबायो बँकफमधील १९,००० महिला आणि १७,००० पुरुषांच्या विदाचे () २०२५ मध्ये विश्लेषण करण्यात आले. या विश्लेषणातून असे स्पष्ट झाले, की ज्या पालकांना जास्त मुले होती, त्यांच्या मेंदूतील कार्यक्षम जोडण्या ( ) वयानुसार होणाऱ्या झिजेशी यशस्वीरीत्या लढा देत होत्या. सोप्या भाषेत सांगायचे तर, ज्या पालकांना जास्त मूले आहेत, त्यांचे मेंदू वाढत्या वयातही अधिक तरुण आणि कार्यक्षम राहतात. यालाच वैज्ञानिक भाषेत ङ्कन्युरोप्रोटेक्शनफ (मेंदूचे संरक्षण) म्हणतात.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# महिलांना क्रिकेट खेळता येत नाही, तर ते चांगलं जेवण बनवतात, शाहिद आफ्रिदीच्या विधानामुळे वातावरण तापले

■ दुबई/वृत्तसंस्था

महिला आशिया कपमध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाकडून पाकिस्तान महिला संघाचा एकतर्फी आणि दारुण पराभव झाल्यानंतर, पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि महान अष्टपैलू खेळाडू शाहिद आफ्रिदीचे एक जुने आणि अत्यंत वादग्रस्त विधान सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. भारताकडून झालेल्या या मानहानीकारक पराभवानंतर, चाहते आफ्रिदीचे विधान शेअर करत आहेत आणि पाकिस्तानी महिला संघ तसेच आफ्रिदी या दोघांनाही ट्रोल करत आहेत.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले हे विधान, ARY न्यूजला दिलेल्या एका जुन्या मुलाखतीमधील आहे. जेव्हा





एका पत्रकाराने आफ्रिदीला पाकिस्तानी महिलांच्या क्रिकेट खेळण्याबद्दल आणि कराचीमधील महिला क्रिकेट ट्रायलबद्दल विचारले, तेव्हा आफ्रिदीने हसत हसत हे वादग्रस्त विधान केले होते. महिला क्रिकेटबद्दलच्या प्रश्नाला उत्तर देताना आफ्रिदी म्हणाला, "आमच्या महिलांच्या हाताला चव आहे; त्या खूप चांगले आणि स्वादिष्ट जेवण बनवतात."आफ्रिदीच्या या विधानावरून असा थेट संकेत दिला जात आहे की, महिलांचे काम केवळ मैदानावर क्रिकेट खेळण्यापुरते मर्यादित नसून ते स्वयंपाकघरापुरतेच मर्यादित आहे. भारताकडून सामना गमावल्यानंतर, क्रिकेट चाहते ही व्हिडिओ क्लिप पुन्हा शेअर करत आहेत आणि म्हणत आहेत की, आफ्रिदीचे महिला-विरोधी वक्तव्य आजही पाकिस्तानी क्रिकेटची कालबाह्य मानसिकता दर्शवते.

सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर टीका आणि विरोध झाल्यानंतर, शाहिद आफ्रिदीने आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले. स्वतःचा बचाव करताना, आफ्रिदीने दावा केला की त्याचे वक्तव्य संदर्भाबाहेर घेतले गेले आणि अपूर्ण क्लिप्स प्रसारित करून त्याची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. आफ्रिदीने स्पष्ट केले की तो नेहमीच महिला क्रिकेटचा समर्थक राहिला आहे आणि त्याने वैयक्तिकरित्या अनेक महिला खेळाडूंना प्रायोजकत्व मिळवून देण्यासाठी मदत केली आहे.

आफ्रिदीचे वक्तव्य पुन्हा व्हायरल झाल्यानंतर, एक्स (X) सारख्या प्लॅटफॉर्मवरील क्रिकेट चाहत्यांनी त्याच्या विरोधात मोहीम सुरू केली आहे. बहुतेक नेटकऱ्यांनी आणि चाहत्यांनी या वक्तव्याला लिंगभेद आणि कालबाह्य विचारसरणीचे प्रतीक म्हटले आहे. चाहत्यांचे म्हणणे आहे की, एकीकडे भारतीय महिला संघ जगभरात देशाचा झेंडा फडकवत आहे, तर दुसरीकडे पाकिस्तानचे अव्वल खेळाडू अजूनही महिलांना स्वयंपाकघरापुरतेच मर्यादित मानतात.

## महेंद्रसिंह धोनीबाबत मोठा खुलासा! खेळाडूने सांगितली आतली गोष्ट, नेमकं काय घडतंय?

**मुंबई** : आयपीएल 2026 स्पर्धेच चेन्नई सुपर किंग्सची कामगिरी निराशाजनक राहिली. या पर्वात महेंद्रसिंह धोनी दुखापतीमुळे खेळला नाही. आता आयपीएल 2027 पर्वात खेळणार की नाही, असा प्रश्न आहे. त्यात महेंद्रसिंह धोनीकडून पुढच्या पर्वात खेळण्याबाबत कोणतेही संकेत दिलेले नाहीत. त्यामुळे त्याचे चाहते संभ्रमात आहे. रोज काही ना काही बातमी समोर येत असल्याने संभ्रमाचं वातावरण आहे. असं असताना चेन्नई सुपर किंग्सचा वेगवान गोलंदाज आकाश मढवाल याने महेंद्रसिंह धोनी पुढच्या पर्वात खेळणार असा विश्वास व्यक्त केला आहे. आयपीएलच्या पुढच्या पर्वात खेळण्याचा निर्णय महेंद्रसिंह धोनी स्वत: करेल. पण धोनी ज्या पद्धतीने सराव करत आहे, ते पाहून असं दिसतंय की पुढच्या पर्वात खेळेल. आकाशच्या मते, सीएसके कॅंपमध्ये धोनी रूजू झाल्यापासून कोणताही सराव शिबिर सोडलेलं नाही. तो सलग फलंदाजी करत आहे आणि सरावात पूर्ण मेहनत करत आहे. हे पाहूनच आकाशने हा अंदाज बांधला आहे. महेंद्रसिंह धोनीच्या तयारीबाबत आकाश मढवालने सांगितलं की, त्याचं फिटनेस पाहून पूर्ण विश्वास आहे की आयपीएल 2027 स्पर्धेत खेळेल. दरम्यान, महेंद्रसिंह धोनी खेळेल की नाही हे अद्याप अस्पष्ट



आहे. पण आकाश मढवालने त्याचं म्हणणं काय आहे ते मांडलं आहे. त्यामुळे त्याचं म्हणणं धोनीच्या चाहत्यांना दिलासा देणारं आहे. आकाशने संघात धोनीच्या वर्तनावरही भाष्य केलं. धोनी खुप शांत आहे आणि इतर खेळाडू त्याच्याशी सहज बोलू शकतात. कोणालाही काहीही अडचण असेल किंवा प्रश्न असेल तर ते धोनीचा थेट सल्ला घेऊ शकतात. धोनीसोबत ड्रेसिंग रूम शेअर करणं युवा खेळाडूंसाठी अनुभवाची शिदोरी आहे.माजी क्रिकेटपटू सुब्रमण्यम बद्रीनाथने नुकताच खुलासा केला होता की, धोनीला केवळ 'इम्पॅक्ट प्लेयर' म्हणून मैदानात उतरायचे नाही. जर तो खेळला, तर तो पूर्णवेळ यष्टिरक्षक-फलंदाज म्हणूनच खेळेल, अन्यथा तो खेळणार नाही. दरम्यान, धोनीने चेन्नई सुपर किंग्सला 2010, 2011, 2018, 2021 आणइ 2023 मध्ये आयपीएलचे विजेतेपद मिळवून दिले. आयपीएलमध्ये कर्णधार म्हणून 130 हून अधिक सामने जिंकणारा तो एकमेव खेळाडू आहे.

## मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा

**मुंबई** : ऑस्ट्रेलिया ए आणि भारत ए यांच्यात होणाऱ्या आगामी मालिकेसाठी बीसीसीआयने संघाची घोषणा केली आहे. या मालिकेत दोन मल्टी डे आणि तीन एकदिवसीय सामन्यांचा समावेश आहे. भारत ए आणि ऑस्ट्रेलिया ए यांच्यातील या मालिकेला २२ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. पहिला मल्टी डे सामना 22 ते 25 सप्टेंबर तर दुसरा मल्टी डे सामना 29 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर दरम्यान खेळवला जाईल. यानंतर 6, 9 आणि 11 ऑक्टोबर रोजी तीन एकदिवसीय सामने होतील. या दोन्ही मालिकेतील सर्व सामने पुदुचेरी येथे खेळवले जाणार आहेत. निवड समितीने दोन्ही फॉरमॅटसाठी दोन वेगवेगळे संघ जाहीर केले आहे. या संघात युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. मल्टी डे संघाच्या कर्णधारपदी देवदत्त पडिक्कलकडे असणार आहे. तर उपकर्णधारपदी साई सुदर्शन असणार आहे. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी ऋतुराज गायकवाडकडे कर्णधारपद असेल. तर देवदत्त पडिक्कल उपकर्णधारपद असेल.ऑस्ट्रेलिया ए संघाविरुद्धच्या वनडे संघात अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्याचाही समावेश करण्यात आला असून, पण खेळणार की नाही याबाबत साशंकता आहे. त्याचं खेळणं फिटनेस क्लियरन्सवर अवलंबून असणार आहे.

## शेवटच्या षटकातील थरार..! कर्णधार प्रभसिमरन सिंहच्या भांगडा नृत्याने जिंकली उपस्थितांची मनं...

**मुंबई** : शेर ए पंजाब टी20 लीग 2026 स्पर्धेत जालंधर वॉरियर्स आणि लुधियाना लायन्स यांच्यात सामना झाला. या सामन्यात जालंधर वॉरियर्सने 7 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना जालंधर वॉरियर्सने 20 षटकात 8 गडी गमवून 169 धावा केल्या. जालंधर वॉरियर्सची सुरुवात खराब झाली होती आणि 20 धावांवर 3 गडी गमावले होते. मात्र त्यानंतर जालंधर वॉरियर्सने डाव सावरला. कर्णधार प्रभसिमरन सिंगने 39 धावा केल्या. गौरव मार्कन आणि आर्यन यादवने 42 चेंडूत 65 धावांची भागीदारी केली. गौरव मार्कनने 52 धावा केल्या, तर आर्यन यादवने नाबाद 35 धावांची खेळी केली. लुधियाने लायन्सचा गोलंदाज क्रिश भगतने चार षटकात 36 धावा देत 4 गडी बाद केले. प्रत्युत्तरात, लुधियाना लायन्सने 20 षटकात 8 गडी गमवून 162 धावा केल्या. खरं तर शेवटच्या चेंडूपर्यंत हा सामना कोणाच्या पारड्यात पडणार याची उत्सुकता होती. शेवटच्या षटकात लुधियाना लायन्सला 10 धावांची गरज होती.लुधियाना लायन्सला शेवटच्या षटकात 10 धावांची गरज होती. कर्णधार प्रभसिमरन सिंगसमोर मोठा पेच होता की षटक कोणाला द्यायचं? पण त्याने युवा फिरकीपटू रणदीप सिंग यांच्याकडे चेंडू सोपवला. त्यामुळे त्याच्याकडे 10



धावा रोखण्याचं मोठं आव्हान होतं. त्याने चेंडू हाती घेतला आणि पहिल्याच चेंडूवर विकेट काढली. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास दुणावला. दुसऱ्या चेंडू टाकला आणि निर्धाव गेला. त्यामुळे लुधियाना लायन्सच्या फलंदाजावर दबाव वाढला. 4 चेंडूत 10 धावा अशी स्थिती आहे.

त्यानंतर तिसऱ्या चेंडूवर त्याने आणखी एक विकेट काढली आणि सामना 3 चेंडूत 10 अशा स्थितीत आला. चौथ्या आणि पाचव्या चेंडूवर प्रत्येकी एक धाव आली. त्यामुळे शेवटच्या चेंडूवर 8 धावांची गरज होती. पण हा चेंडूही निर्धाव गेला आणि सामना जालंधर वॉरियर्सच्या पारड्यात पडला.रोमहर्षक विजयानंतर कर्णधार प्रभसिमरन सिंगने जल्लोष केला. त्याने मैदानात भांगडा करून आपला आनंद साजरा केला. त्याचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. प्रभसिमरन सिंगने शेर ए पंजाब टी20 लीग स्पर्धेच्या सात सामन्यात 203.36 च्या स्ट्राईक रेटने 484 धावा केल्या.

## रन तर तुझे ही होतं नाही मग तुला संघाच्या बाहेर का काढत नाही...

■ मुंबई/वृत्तसंस्था

एडजबॅस्टन येथे इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यापूर्वी, पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने आपल्या खराब फॉर्मबद्दल विचारलेल्या प्रश्नांना सडेतोड उत्तर दिले आहे. एका पत्रकार परिषदेदरम्यान, मोहम्मद रिझवान आणि सलमान अली आगा यांना खराब फॉर्ममुळे संघातून वगळल्याचा उल्लेख करत, एका पत्रकाराने बाबरच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यावर बाबर आझमने जे उत्तर दिले त्याची जोरदार चर्चा सुरु आहेआपल्या कसोटी कामगिरीबद्दल स्पष्टीकरण देताना बाबर आझमने सडेतोड उत्तर दिले, "जर तुम्ही कामगिरीबद्दल बोलत असाल, तर मला वाटते की मी मागील मालिकेत 'प्लेअर ऑफ द सिरीज' होतो." वेस्ट इंडिजविरुद्धच्या त्या दोन सामन्यांच्या मालिकेत, बाबरने दोन अर्धशतकांसह ९६.५० च्या सरासरीने १९३ धावा केल्या होत्या, ज्यामुळे त्याला हा पुरस्कार मिळाला होता.मात्र, सध्या सुरू असलेल्या इंग्लंड दौऱ्यावर बाबर आझमची बॅट पूर्णपणे शांत आहे. दुखापतीमुळे पहिली कसोटी चुकवल्यानंतर, त्याने दुसऱ्या सामन्यात पुनरागमन केले, परंतु दोन्ही डावांमध्ये त्याला केवळ १४ धावा करता आल्या. लॉर्ड्सवर झालेल्या या १९८ धावांच्या दारुण पराभवामुळे पाकिस्तान तीन सामन्यांच्या मालिकेत ०-२ ने मागे पडला आहे.

या दारुण पराभवामुळे पाकिस्तानी गटात मोठी उलथापालथ झाली आहे. मोहम्मद रिझवान आणि इमाम-उल-हक यांच्यासह सात खेळाडूंना बाद करून त्यांना मायदेशी परतण्यास सांगितले. इतकेच नाही, तर मुख्य प्रशिक्षक सरफराज अहमद आणि गोलंदाजी प्रशिक्षक उमर गुल यांनाही त्यांच्या पदावरून हटवण्यात आले. बाबरने या मोठ्या निर्णयांमध्ये आपला कोणताही सहभाग नाकारला आहे.

पाकिस्तानी कर्णधाराचा कसोटी क्रिकेटमधील फॉर्म चिंतेचा विषय बनला आहे, कारण त्याने डिसेंबर २०२२ पासून एकही कसोटी शतक झळकावलेले नाही. कर्णधाराची वैयक्तिक कामगिरी, तसेच संघाची एकूण कामगिरी निराशाजनक राहिली आहे. याचा परिणाम म्हणून, २०२५ मध्ये सुरू झालेल्या २०२५-२७ च्या



जागतिक कसोटी चॅम्पियनशिप चक्रातील आठ सामन्यांपैकी पाकिस्तानला केवळ दोनच सामने जिंकता आले आहेत आणि अंतिम फेरीच्या शर्यतीतून तो संघ जवळपास बाहेर पडला आहे.

# डोळ्यात चिंतेचे ढग!

# पिके करपली; कोरडा दुष्काळ जाहीर करून मदत द्या!

## राज्य प्रवक्त्या जयश्री शेळके यांच्या नेतृत्वात शिवसेनेची जिल्हा कचेरीवर धडक!

जनसंचलन/बुलडाणा

यावर्षी अत्यल्प व अनियमित पाऊस झाल्याने जिल्ह्यातील खरीप हंगामातील पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे. मागच्या ४० दिवसांपासून पावसाच्या दीर्घ खंडामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मका, उडीद, ज्वारी, व इतर पिके करपली असून शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत द्यावी. तसेच चालू पीक विम्याच्या रकमा तातडीने वितरित कराव्यात. प्रलंबीत कर्जमाफी, शेतीसाठी नियमित वीजपुरवठा करण्यात यावा या मागण्यांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आज जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना आज निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब



ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख जालिंधरभाऊ बुधवत, जिल्हा समन्वयक गजाननभाऊ धांडे, उपजिल्हाप्रमुख लखनभाऊ गाडेकर, युवासेना जिल्हाप्रमुख नंदूभाऊ कऱ्हाडे, किसानसेना उपजिल्हाप्रमुख गजाननभाऊ उबरहंडे , बुलढाणा तालुकाप्रमुख विजयभाऊ इतवारे, मोताळा तालुकाप्रमुख विजयभाऊ इंगळे, किसानसेना तालुका प्रमुख गणेशभाऊ रिंढे, बुलढाणा शहरसंपर्कप्रमुख सुनीलभाऊ भाग्यवंत,बुलढाणा शहराध्यक्ष विजय राउत, विधानसभा संघटक सुनीलभाऊ घाटे, धामणगांव बढे यांच्या सह इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# आ. संजय गायकवाड विरुद्ध झिरो एफआयआर दाखल करण्यासाठी आ. रोहित पवार कोथरूड पोलीस ठाण्यात धडकणार!





जनसंचलन/बुलडाणा

स्व. कॉम्रेड गोविंद पानसरे लिखीत शिवाजी कोण होता? पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांच्या पत्नी आरती आंबी आ.संजय गायकवाड यांनी केलेल्या अश्लील शिवीगाळ प्रकरणी विनयभंगा बाबत झिरो एफआयआर दाखल करण्यासाठी ११ सप्टेंबर रोजी आ.रोहित पवार यांच्या सोबत कोथरूड पोलीस ठाण्यात धडकणार आहे. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आरती आंबी या आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात कोथरूड पोलीस स्टेशन येथे शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी जात आहेत. सरकारला जाब विचारला म्हणून पुण्यातील संतोष पंडित यांना मध्यरात्री अटक होते.मात्र आमदार संजय गायकवाड यांनी मध्यरात्री फोनवर महिलेला लाजेची हानी होईल,अशी अश्लिल शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली, त्यांना अटक होत नाही,गुन्हा दाखल होत नाही, त्यांच्यासाठी कायदा वेगळा आहे का? असे म्हणत प्रशांत आंबी यांच्या पत्नी आरती आंबी आमदार संजय गायकवाड विरुद्ध विनयभंगाची तक्रार दाखल करणार असल्याची माहिती आहे. कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी फोनवरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व धमकी दिल्यामुळे एप्रिल २०२६ मध्ये हा मोठा वाद निर्माण झाला होता. कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावर आमदार संजय गायकवाड यांनी आक्षेप घेतला होता. पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याचा व बदनामी केल्याचा दावा त्यांनी केला होता. आक्षेपावरून आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना रात्री फोन करून अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली होती.याची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली होती.

# सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सवाला रविवार पासुन प्रारंभ!

जनसंचलन-बुलडाणा



अखिल भारतीय पंचकृष्ण प्रबोधन परिषद जाळीचा देवच्या वतीने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सवाचे दोन दिवसीय आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त १३ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता बुलडाणा शहरातुन शोभायात्रा काढण्यात येणार आहे. १४ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय श्रीमदभगवदगिता ज्ञानस्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. प पु प म आम्नाय आचार्य श्रीलोणारकर बाबा महानुभाव यांचे मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. रविवार, १३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत व्यक्तीमत्व विकास युवक मेळावा, श्रीमदभगवदगिता ज्ञान परिसंवाद स्पर्धा, दुपारी १२ वाजता सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन सोहळा, दुपारी २ वाजता शोभायात्रा व सायंकाळी ७ वाजता कीर्तन प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. १४ सप्टेंबर रोजी प्रातः काळी ५ वाजता देवपुजेस मंगलस्नान, श्रीमदभगवदगिता पारायण, ८ वाजता ध्वजारोहण, स्वागत, दीप प्रज्वलन, ९ वाजता सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या तत्वज्ञानावर प्रबोधन व सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचे तत्वज्ञानावर प्रबोधन श्रीमदभगवदगिता ज्ञानस्पर्धा बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. दुपारी १२ वाजता पंचावतार उपहार व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. प्रमुख आचार्यांमध्ये आम्नाय आचार्य श्रीमेहकरकर बाबा महानुभावा, आचार्य श्री पाथरीकर बाबा महानुभाव, आचार्य श्री भीष्माचार्यबाबा महानुभाव आचार्य श्री चिंचोडीकरबाबा महानुभाव यांची उपस्थिती राहणार आहे. मान्यवरांमध्ये कामगार मंत्री आकाश फुंडकर, आ संजय गायकवाड, कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आ श्वेता महाले, आ अमित झनक, आ अमोल जावळे, आ धीरज लिंगाडे, आ प्रविण तायडे, शेंदुर्णी नगराध्यक्ष गोविंदसेठ अग्रवाल, प्रमोद कोरडे, नरेश शेळके, डी एस लहाने, जयश्री शेळके, माजी आ विजय जाधव, जिल्हा केंद्रीय बँक अध्यक्ष डॉ राजेंद्र शिंगणे, भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, हर्षवर्धन देशमुख, जिल्हाधिकारी प्रविण देवरे, हेमंत काळमेघ, पोलीस अधीक्षक नीलेश तांबे, शुभांगी शिरसाठ ,ज्योती उके, तहसीलदार विठ्ठल कुमरे, पोलीस निरीक्षक संग्राम पाटील आदींची उपस्थिती राहणार आहे.



# बैल घामाची प्रतिमा, बैल श्रमाचे प्रतीक।

## शेळके दांपत्याची बैलांप्रती कृतज्ञता!

जनसंचलन/बुलढाणा

बैल आभाळाची कृपा, बैल धरतीचा जप। काळ्या मातीची पुण्याई, बैल फळलेले तप।। बैल घामाची प्रतिमा, बैल श्रमाचे प्रतीक। बैल माझ्या शिवारात, काढी हिरवे स्वस्तिक।। ज्येष्ठ वऱ्हाडी कवी विठ्ठल वाघ यांचा वृषभसूक्त नावाचा कवितासंग्रह... विलक्षण अशा भूदेव शब्दांत त्यांनी बैलाचे वर्णन केले. अशा बैलाच्या श्रमावरच आपली संस्कृती उभी आहे. या बैलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वर्षातला एक दिवस त्याच्यासाठी राखून ठेवलेला सण म्हणजे पोळा! हा सण आज शेती मातीशी नाळ जुळलेल्या शिवसेनेच्या राज्यप्रवक्त्या जयश्रीताई शेळके व अभिता ॲग्रो कंपनीचे सीईओ सुनील शेळके या दांपत्याने सर्जा-राजा ची विधिवत पूजा करून साजरा केला. आज पुंजा रे बैलाले फेडा उपकाराचं देनं बैला, खरा तुझा सण शेतकऱ्या तुझं रीन ही कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची काव्यओळ पोळा सणाचा अर्थ अधोरेखीत करते. पोळा हा सण शेतकरी मोठ्या धुमधडाक्यात साजरा करतात.परंतु कोरड्या दुष्काळामुळे यंदाचा बैल पोळा सण अतिशय



साधेपणाने साजरा केला आहे. गेल्या ४० दिवसांपासून पावसाने गडी मारल्यामुळे शेतातील पिके करपली आहे.जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी या मागणीसाठी, आज उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने जिल्हा कचेरीवर धडक देऊन विविध मागण्या मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आल्या आहे.शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा शासन दरबारी डेटा लावल्यानंतर शेळके दाम्पत्यांनी पूजनाने बैलाप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# बैलपोळा,पण जरा हटके! मेहकरात लक्षवेधी ट्रॅक्टरपोळा!

जनसंचलन-मेहकर

शेतीमध्ये आधुनिकीकरण वाढल्याने पारंपारिक बैलांचा वापर हळूहळू कमी होत आहे. शेतकऱ्यांनी शेतीच्या मशागतीसाठी बैलांच्या जागी ट्रॅक्टरचा वापर सुरू केला आहे. ट्रॅक्टरने शेतीची कामे होत असल्याने बैलांप्रमाणे ट्रॅक्टरचा पोळा भरविण्याची संकल्पना पुढे आली आणि मेहकर येथे पोळ्यानिमित्त ट्रॅक्टर पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. ट्रॅक्टरचे सारथी होऊन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव झाले ट्रॅक्टर पोळ्यात सहभागी होते. सर्वत्र बळीराजाचा सर्वात महत्त्वाचा सण बैलपोळा साजरा होत आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ट्रॅक्टरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणत शेती उपयोगी कामे केली जातात. आजच्या शेतीमध्ये बैलांची आणि ट्रॅक्टर यांची उपयोगिता सारखीच असल्याने बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे पोळ्यानिमित्त ट्रॅक्टर पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या ट्रॅक्टर पोळ्या मध्ये केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव ट्रॅक्टर चालवत या पोळ्यात सहभागी झाले होते.शेतकऱ्यांसोबत रात्रंदिवस शेतात राबणाऱ्या बैलाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टिकोनातून सर्वत्र पोळा हा सण साजरा केला जातो परंतु आजच्या आधुनिक युगामध्ये



शेतकऱ्याकडील बैल जोड्यांची संख्या कमी झाली आहे. शेतीच्या कामगिरी आता ट्रॅक्टरचा उपयोग केला जातो किंबहुना त्या माध्यमातून शेतीची कामे केले जातात. त्यामुळे पोळ्या सारखे सण उत्सव हे पुढेही कायम राहावे या दृष्टिकोनातून बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे शेतकरी बांधवांच्या वतीने एक आगळा वेगळा पोळा साजरा करत एक आभीनव मिरवणूक मेहकर शहरातील मुख्य मार्गाने काढण्यात आली.या ट्रॅक्टर पोळ्यामध्ये जवळपास १५० ते २०० ट्रॅक्टर सहभागी झाले होते.जे वर्षभर आपल्या बळीराजा करिता शेतात सर्जा राजाच्या बरोबरीने आजच्या आधुनिक युगात योगदान देत असतात असे ट्रॅक्टर देखील आज आपल्याला शहरातील रस्त्यावर दिसुन आले.या ट्रॅक्टर पोळ्यामध्ये केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव माजी आमदार संजय रायमुलकर युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव यांच्यासह शेकडो शेतकरी आपले ट्रॅक्टर घेऊन या ट्रॅक्टर पोळ्याच्या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

# शेतकरी प्रश्नांवर रविकांत तुपकरांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील व सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्याशी चर्चा!

जनसंचलन/बुलडाणा

राज्यातील शेतकरी गंभीर संकटातून जात असताना शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार,मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. कर्जमाफी, वीज व पीक विम्याचा मुद्दा ङ्कॅबिनेटमध्ये शेतकरी प्रश्न लावून धराफ, अशी जोरदार मागणी रेटली. पावसाचा खंड, माना टाकलेली सोयाबीनची पिके आणि त्यामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती याची दाहकता तुपकरांनी दोन्ही मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आक्रमक भूमिका घेणारे तुपकर आता सरकारसोबत थेट संवाद साधत या प्रश्नांवर ठोस



निर्णयासाठी पाठपुरावा करत आहेत. मुंबईतील या भेटीत त्यांनी सध्याची परिस्थिती केवळ प्रशासकीय अहवालांमधून नव्हे, तर प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या अनुभवातून मंत्र्यांसमोर मांडली. पावसातील मोठ्या खंडामुळे सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठे नुकसान होत असल्याने राज्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी तुपकरांनी केली. शेतकऱ्यांना पूर्णवेळ वीज उपलब्ध करून देणे, जळालेले ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलणे आणि पीक विम्याचा प्रश्न मार्गी लावणे, या मागण्याही त्यांनी मंत्र्यांसमोर मांडल्या. शेतकऱ्यांच्या कर्जाच्या प्रश्नावरही तुपकरांनी सरकारचे लक्ष वेधले. सरसकट कर्जमाफी करावी, २०१९ पूर्वीच्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचा समावेश करावा, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. कर्ज पुनर्गठन आणि रूपांतरित कर्जधारकांनाही मदतीच्या कक्षेत आणावे, तसेच कर्जाच्या थकबाकीमुळे शेतकऱ्यांचा सिबिल खराब होऊन भविष्यातील कर्जाचा मार्ग बंद होऊ नये, यासाठी ठोस निर्णय घेण्याची मागणीही त्यांनी केली. यासाठी मुख्यमंत्र्यांनी आरबीआय सोबत चर्चा करून बँकांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी भूमिका तुपकरांनी मांडली.

## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्यास ११ सप्टेंबरपर्यंत मुदत

जनसंचलन/बुलढाणा



राज्य शासनाच्या वतीने सन २०२५ पासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्य उत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६ साठी अर्ज सादर करण्याची मुदत ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत आहे. यावर्षीपासून देशभरातील आणि देशाबाहेरील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठीही स्वतंत्र बक्षिसे ठेवण्यात आली असून जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता यावे, या उद्देशाने अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख आता शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांना आता शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२:00 पर्यंत अर्ज सदर स्पर्धेसाठी अर्ज सादर करता येणार आहे. या स्पर्धेसाठीचे अर्ज https:// ganeshotsav.pldmka.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जात आहेत. तरी बुलढाणा जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके पटकावावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८